# भारती विद्यापीठाचे
# मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय, कडेगाव
# राष्ट्रीय सेवा योजना
# **सन** २०२३-२०२४
# विशेष श्रमसंस्कार शिबीर कार्य अहवाल

भारती विद्यापीठाचे मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय, कडेगाव आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर मौजे अपशिंग, ता.कडेगाव, जि.सांगली येथे गुरूवार दि.२५.0१.२०२४ ते बुधवार दि.३१.0१.२०२४ या कालावधीत संपन्न झाले. त्या शिबिराचा कार्य अहवाल पुढीलप्रमाणे ः

**२५.0१.२०२४**

मौजे अपशिंगे गावातील सर्व ग्रामस्थांनी गावाच्या वेशीवरती सर्व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविकांचे स्वागत ढोल ताशाच्या गजरात व गुलाब पुष्प देऊन केले. यावेळी गावचे सरपंच मा.श्री.भारत सुर्यवंशी, श्री.तुकाराम सुर्यवंशी (उपसरपंच), श्री.नामदेव सुर्यवंशी (चेअरमन) व गावातील ग्रामस्थ व महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या.

**उद्‌घाटन समारंभ ः**

‘राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिराचे उद्‌घाटन दि. २५.१.२०२४ रोजी करण्यात आले. या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य मा. श्री.मधूनाना भोसले उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून देशासाठी उपयुक्त पिढी घडते असे प्रतिपादन उद्‌घाटन समारंभ प्रसंगी केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. त्यांच्यामध्ये राष्ट्रभक्ती वाढीस लागते. भविष्यात राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी हे देशासाठी उपयुक्त पिढी असेल असे त्यांनी बोलताना सांगितले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.वाय.कदम होते. त्यांनी या शिबिरादरम्यान गाव स्वच्छ करण्याचा प्रयत्न स्वयंसेविकांनी करावा असे प्रतिपादन केले. त्याचबरोबर या शिबीरकाळात गावाला नवीन दिशा देण्याचे काम या स्वयंसेविका करतील असे सांगितले.

या कार्यक्रमास अपशिंगे गावचे सरपंच श्री. भारत सुर्यवंशी, श्री.तुकाराम सुर्यवंशी (उपसरपंच), श्री.नामदेव सुर्यवंशी (चेअरमन) व सर्व प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा.अविनाश यादव यांनी केले. तर आभार प्रा.सविता माळी यांनी मानले. कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाल्यानंतर स्वयंसेविकांनी श्रमदान केले.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविकांनी रात्री गावातून मेणबत्ती फेरी काढून विविध घोषणाव्दारे अपशिंगे गावामध्ये जनजागृती करण्याचे काम केले.

**दि.२६.0१.२०२४ ः**

२६ जानेवारी हा प्रजासत्ताक दिवस या दिवशी मौजे अपशिंगे येथे ग्रामपंचायत कार्यालय येथे मा.सरपंच श्री.भारत सुर्यवंशी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर जिल्हा परिषद शाळा सोसायटी साठेनगर येथे ध्वजारोहण करण्यात आले. यासाठी सर्व स्वयंसेविका व कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते. ध्वजारोहण झाल्यानंतर सर्व गावातून स्वयंसेविकांनी प्रभात फेरी काढली. यावेळी भारत माता की जय, भारतीय स्वातंत्र्याचा विजय असो अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी सर्व ग्रामस्थ, स्वयंसेविका व प्राथमिक शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले होते.

त्यानंतर गावात श्रमदान (मुख्य रस्त्याची स्वच्छता केली).

**व्यक्तिमत्व विकास ः**

सायंकाळी सात वाजता डॉ.राजेंद्र लवट, राजे रामराव महाविद्यालय जत यांचे **व्यक्तिमत्व विकास** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले होते. त्यांनी असे सांगितले की, विद्यार्थ्यांनी नेहमी वाचन कराव, आपला दृष्टिकोन सकारात्मक असावा. आपल्या अंगी आत्मविश्वास असावा व नेहमी धाडसी वृत्ती असावी हे चार गुण जर आपल्या अंगी असतील तर तुमचे व्यक्तिमत्व चांगले घडू शकते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.श्रीमंत सुर्यवंशी (सर) हे होते. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.अविनाश यादव यांनी केले तर आभार प्रा. सविता माळी यांनी मानले.

**दि.२७.१.२०२४**

या दिवशी सकाळच्या सत्रात योगासने व्यायाम करून गावातील सर्व महत्वाचे चौकात जावून स्वच्छता केली.तर संध्याकाळी **बाईपण भारी देवा** या विषयावर प्रा.कविता म्हेत्रे (अध्यक्ष जीत फौंडेशन म्हसवड) यांचे सुमधूर असे व्याख्यान झाले.त्यांनी आपल्या व्याख्यानात कालची व आजची स्त्री याविषयी माहिती दिली.तर आजच्या स्त्रियांनी विज्ञानवादी बनून देश सशक्त करावा असे उद्‌बोधन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अपशिंगे गावचे ह.भ.प.केदारनाथ सुर्यवंशी महाराज होते.त्यांनी महिलांना असे उद्‌बोधन केले की महिलांनी स्वतःमध्ये बदल करून देशात सकारात्मक बदल करावा.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सविता माळी यांनी केले तर आभार कु.वैष्णवी कदम हिने मानले.या कार्यक्रमासाठी कु.प्रितम पाटील, कु.रोहिणी मोटे व निता शिंदे मॅडम उपस्थित होत्या. रात्री शेकोटी व अंताक्षरी चा कार्यक्रम संपन्न झाला.

**दि.२८.१.२०२४**

या दिवशी सकाळच्या सत्रात योगासने, व्यायाम करून स्वयंसेवकांनी अपशिंगे गावापासून एक कि.मी.अंतरावर ‘पाणी आडवा पाणी जिरवा’या संकल्पनेतून वनराई बंधारा बांधण्यात आला.भविष्यकाळात बंधाऱ्याचा उपयोग तिथे असणाऱ्या शेती सिंचनासाठी चांगल्या प्रकारे होईल. तसेच दुपारच्या सत्रात गटचर्चाचे आयोजन करण्यात आले. संध्याकाळी ‘कवितेसाठी जगणे माझे’ या विषयावर प्रा. संतोष काळे आर्ट्स, कॉमर्स व सायन्स कॉलेज, पलूस यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. हृदयातून उंचबळून येणाऱ्या या भावनांचा सहज असा उद्रेक म्हणजे कविता असे

प्रतिपादन प्रा. संतोष काळे यांनी केले. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेविका कु.वैष्णवी माने व सानिका पवार यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री हणमंत पांडुरंग सुर्यवंशी होते. प्रा. रोहिणी मोटे हिने आभार मानले.

**दि.२९.१.२०२४**

सकाळच्या सत्रात अपशिंगे गावच्या पश्चिमेस असर्णा या डोंगरावरील ग्रामदैवत महादेव मंदिर व परिसरात स्वच्छतेचे काम स्वंयसेविकानी केले. त्याचबरोबर निसर्ग सानिध्याचा आनंदही लुटला. महादेव मंदिर डोंगरावरती असल्यामुळे स्वयंसेविकांना ट्रेकिंगचाही अनुभव घेता आला.तसेच त्याच ठिकाणी वनभोजन करण्यात आले.

दुपारच्या सत्रात महिलांसाठी हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.त्याचवेळी महिलांसाठी उखाणे स्पर्धा महिलांचे विविध पारंपारिक खेळ घेण्यात आले.

संध्याकाळच्या सत्रात प्रा.विनोद निकम (सौ. शोभाकाकी बाबर कन्या महाविद्यालय विटा) यांचे **छत्रपती संभाजी महाराज व सध्याची तरूणाई** यांचे बहारदार असे ऐतिहासिक व्याख्यान झाले.सध्याच्या पिढीने छत्रपती संभाजी महाराज यांचा आदर्श जोपासावा असे आवाहन त्यांनी या प्रसंगी बोलताना केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.भारत शिवाजी कुंभार यांनी शंभुराज्याच्या सारखे तरूणाईच्या मनामध्ये देशप्रेम, स्वच्छ चारिज्य असावे असे सांगितले.

या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा.सविता माळी यांनी केले तर आभार प्रा.वैशाली अंबवडे यांनी मानले.

**दि.३०.१.२०२४**

या दिवशी सकाळच्या सत्रात सर्व स्वयंसेवकांनी गावातील सर्व घरापुढील स्वच्छता करून जनजागृती करण्यासाठी संदेश रांगोळया काढल्या.तसेच गणेश मंदिर परिसरात स्वच्छता केली.तसेच सायंकाळी ग्रामस्थांच्या करमणूकीसाठी विविध गुणदर्शनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमात व्यसनमुक्ती, हुंडबळी, बालविवाह, स्वच्छता इ.संदर्भात जनजागृती करण्यात आली. तसेच या कार्यक्रमात मंगळागौर, लावणी, लघूनाटिका इ.सादरीकरण करण्यात आले.या कार्यक्रमासाठी सर्व स्वयंसेविकांनी सहभाग घेतला होता.या कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच श्री.भारत सुर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले.तर आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.सविता माळी यांनी मानले.

**दि.३१.१.२०२४**

या दिवशी ज्या ठिकाणी स्वयंसेविकांनी मुक्काम केलेल्या ठिकाणी म्हणजेच प्राथमिक शाळा व नायकु महाराज मठ या ठिकाणी स्वच्छता केली.तसेच जिल्हा परिषद शाळेच्या पटांगणात झाडांना आळी करून पाणी घातले.

या शिवाय शिबीर कालावधीत दररोज सकाळी व्यायाम, योगासन, प्रार्थना, दुपारी गटचर्चा ग्रामस्थ भेट व रात्री कार्यक्रम अधिकारी आढावा बैठक घेण्यात आली.

**समारोप**

दुपारी ४ वाजता विशेष श्रमसंस्कार शिबीराचा समारोप समारंभ आयोजित केला. या कार्यक्रमासाठी श्री. भारत सुर्यवंशी, सरपंच अपशिंगे यांची प्रमुख उपस्थिती होती. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. व्ही वाय. कदम उपस्थित होते. त्यांनी या प्रसंगी बोलताना सांगितले की राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थीनीचा व्यक्तिमत्व विकासाला समाजाभिमुख नेतृत्वाला चालना मिळते. राष्ट्रीय भावना वाढीस लागते. स्वयंशिस्त व वक्तशिरपणा यांची शिकवण मिळते. या सर्वामुळेच स्वतःची व पर्यायाने राष्ट्राचीही प्रगती होते. या कार्यक्रमात स्वयंसेविकांनी मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. सविता माळी यांनी केले तर आभार प्रा.अमोल शिंदे यांनी मांडले.

हे शिबीर यशस्वी होण्यासाठी भारती विद्यापीठाचे कार्यवाह, माजी मंत्री आ. डॉ. विश्वजीत कदम साहेब, शालेय समितीच्या अध्यक्षा मा. विजयमाला कदम तथा वहिनीसाहेब, महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. व्ही वाय. कदम, राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अविनाश यादव, प्रा. सविता माळी, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, सेवक व सर्व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

हे शिबीर यशस्वी होण्यासाठी अपशिंगे गावचे सरपंच श्री. भारत सुर्यवंशी, उपसरपंच श्री. तुकाराम सुर्यवंशी, गोरख सुर्यवंशी, शिवाजी सुर्यवंशी, ग्रामसेवक सौ. लिना देशमुख, श्री. काका सुर्यवंशी(सर), श्री. दिलीप सुर्यवंशी, श्री. दिलीप कुंभार, श्री. सचिन सुर्यवंशी व सर्व ग्रामस्थ बंधूभगिनींचे मोलाचे सहकार्य मिळाले.




राष्ट्रीय सेवा योजन शिबिर उद्घाटन समारंभ








जनजागृती निमित्त मेणबत्ती फेरी




प्रजासत्ताक दिन प्रभात फेरी




व्याख्यान प्रा. राजेंद्र लवटे(आर.आर,कोलेज जत) –
व्यक्तिमत्व विकास




ग्राम स्वछता मोहीम







प्रा. कविता म्हेत्रे(अध्यक्ष जित फौंडेशन म्हसवड) यांचे व्याख्यान - बाईपण भारी देवा




'कवितेसाठी जगणे माझे' या विषयावर प्रा. संतोष काळे आर्टस, कॉमर्स व सायन्स कॉलेज, पलूस यांचे व्याख्यान







हळदी कुंकू समारंभ




महिलांच्या उखाणे स्पर्धा







प्रा. विनोद निकम(जीवन प्रबोधनी कन्या महाविद्यालय विटा) यांचे व्याखान -छत्रपती संभाजी महाराज आणि आजची तरुणाई




शिबिरातील मुली जेवण बनविताना







ग्रामस्थांना वृक्ष भेट देताना





गावातील परिसर स्वच्छ करताना स्वयंसेवक




समारोप समारंभ

डॉ. सविता माळी

कार्यक्रम अधिकारी

Dr. V Y Kadam

I/C Principal

I/C Principal
B.V.M.B.S.K. Kanya Mahavidyalaya,
Kadegaon, Dist. Sangli